सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२, Ext. 231
pressroom.mum@mahapolice.gov.in

---

जा. क्र.०५/वार्ता. कक्ष/२०२६ दिनांक :- २७/०५/२०२६

# -: प्रेसनोट :-

## दहिसर पोलीस ठाणे - खुन

दि.२५/०५/२०२६ रोजी २३.३० वा. च्या सुमारास फिर्यादी महेश गौतम सुगीरे वय-३५ वर्षे, धंदा- बिगारी, रा.ठि-मीरा रोड, ठाणे यांचा भाऊ सागर सुगीरे, वय-२९ वर्ष हे फिर्यादीची पत्नी व अटक आरोपी पुरुष वय ३५ वर्ष यांच्यामध्ये असलेल्या प्रेमसंबंधाबाबत नचडी भैय्याजी चाळ, डोंगरी केतकी पाडा, दहिसर, मुंबई येथे आरोपीस फिर्यादीच्या पत्नीसोबत अनैतिक संबंध ठेवु नको असे समजावत असताना अटक आरोपीने फिर्यादीच्या भावाला शिवीगाळ करून लाथा-बुक्यांनी तसेच दगडाने मारून व त्यास पकडुन पायऱ्यावरून खाली फेकुन देउन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने गंभीर दुखापत करून बेशुद्ध केले व त्यानंतर पुन्हा त्यास दगडाने मारहाण केली. त्या मारहाणीमुळे उपचारा दरम्यान नायर रुग्णालय येथे फिर्यादीचा भाऊ सागर सुगीरे, वय २९ वर्ष मयत झाला. म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.२६/०५/२०२६ रोजी गु.र.क्र. ६८३/२६, कलम १०३(१), ११५ (२), ३५२, ३५१ (३) बीएनएस २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

---